**प्रेस नोट** **दि.१८/०३/२०१९**

---

## खडक पोस्टे तपास पथकाची कामगिरी

## घरफोडीतील शिक्षा भोगुन आलेला सराईत तडीपार आरोपी अटक व दोन घरफोडीचे गुन्ह्यांचा उकल

सदर बाबत अधिक माहिती अशी की, खडक पोलीस स्टेशन गु.र.नं. १३३/२०१९ भा.दं.वि कलम ४५४,४५७,३८० मधिल फिर्यादी नामे वस्तीमल बाबुलाल मुथा, घोरपडे पेठ, पुणे.यांचे के.बी.एंटरप्रायजेस या नावाचे न्यु टिंबर मार्केट, पुणे येथील दुकान दिनांक ०८/०३/२०१९ चे १९.३० वा.ते दिनांक ०९/०३/२०१९ चे सकाळी ०७:३० वा. दरम्यान बंद असताना कोणी तरी अज्ञात चोरट्याने सदर दुकान फोडून दुकानातून किं.रू.१,११,०००/-रोख रक्कम व इतर मुद्देमाल चोरून नेलेबाबत फिर्याद दिल्याने त्याचा तपास चालू असताना खडक पोलीस ठाणेचे तपास पथकातील पोशि रवी लोखंडे व पोहवा विनोद जाधव यांना त्यांचे बातमीदाराने बातमी दिली की,सदरची चोरी तडीपार आरोपी आकाश ऊर्फ झुरळया पाटोळे रा.अंजुमन मश्जिदचे पाठीमागे कासेवाडी, भवानी पेठ पुणे याने केली असून तो त्याचे राहत घरी येणार आहे अशी बातमी प्राप्त झाल्याने वरिष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी यांनी त्यास दिनांक १२/०३/२०१९ रोजी राहते घराजवळून ताब्यात घेवून तपास करता तपासादरम्याण त्याने आणखी एक घरफोडीचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले सदरबाबत खडक पोलीस ठाणे गु.र.नं.१३९/२०१९,भादवि कलम ४५४,४५७,३८० अन्वये गुन्हा दाखल असून दोन्ही गुन्ह्यात मिळून एकुण १०,०००/- रू.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.सदरचा आरोपी हा सराईत घरफोडी करणारा गुन्हेगार असून त्याचे विरूध्द खडक पोलीस ठाणे येथे ११ ,समर्थ पोलीस ठाणे येथे ०३ असे एकुण १४ गुन्हे दाखल असून त्यास त्यापैकी ०३ गुन्ह्यांमध्ये एक वर्षाची शिक्षा झालेली आहे.

वर नमुद सर्व कारवाई ही श्री रविंद्र सेनगावकर, अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे , श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ व श्री. प्रदिप आफळे ,सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन चे श्री.राजेन्द्र मोकाशी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उत्तमराव चक्रे पोलीस निरीक्षक (गुन्हे) तपास पथकाचे प्रभारी सहा पोलीस निरीक्षक श्री.उमाजी राठोड, पोलीस कर्मचारी विनोद जाधव, रवी लोखंडे,आशिष चव्हाण, प्रमोद नेवसे, समीर माळवदकर,संदिप कांबळे, राकेश क्षिरसागर,इम्रान नदाफ,महावीर दावणे, योगेश जाधव, विशाल जाधव, हिम्मत होळकर, विठ्ठल पाटील, संदिप पाटील, यांचे पथकाने केली.